प्रेसनोट दि. १६/०२/२०१७

अवैद्यरित्या विनापरवाना दोन अग्निशस्त्रे व सहा काडतुसे बाळगणा-या गुन्हेगारास गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक पथकाकडून शिताफिने अटक

oooooooooooooooooooooooooooo

दरोडा प्रतिबंधक पथक गुन्हे शाखा पुणे शहर यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, राष्ट्रभुषण चौक शिवाजी रोड पुणे येथे खुनाचे गुन्हे दाखल असलेला रेकॉर्डवरील गुन्हेगार मंगेश अरविंद खरे रा. तुकाईनगर वडगांव बुद्रुक, पुणे हा येणार आहे त्याचेजवळ पिस्तोल असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यानुसार पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम व त्यांचे अधिनस्त पोलीस कर्मचारी यानी सापळा रचुन इसम नामे **मंगेश अरविंद खरे वय २७ वर्षे रा. तुकाईनगर वडगांव बुद्रुक, पुणे** यास दि. १५/०२/२०१७ रोजी १६.२० वा. चे सुमारास अटक करुन त्याचे कब्जातून एक गावठी बनावटीचे पिस्टल, एक गावठी कट्टा व ६ राऊंड असा सर्व मिळूण ५१,२००/- रु. किंमतीचा माल मिळून आला आहे. त्याचेविरुध्द खडक पोस्टे पुणे येथे भारतीय हत्याराचा कायदा कलम ३ सह (२५), व मु.पो.ॲक्ट कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. सदर आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याने सराईत गुन्हेगार बंटी पवार याचा भाऊ चेतन पवार याचा एक वर्षापुर्वी पुणे ग्रामिण हद्दीत खुन केलेला आहे. सदर बाबत वेल्हा पो.स्टे.गु.र.नं. ५२/२०१५ भा.द.वि.क. ३०२,२०१,भारतीय हत्याराचा कायदा कलम ४ सह (२५) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. तो स्वतःचे जिवीतास बंटी पवार टोळीकडून धोका असल्याने अवैदय अग्नीशस्त्र जवळ बाळगत असल्याची माहीती पुढे आली आहे.

सदरची कामगिरी गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त श्री. दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त श्री पी.आर. पाटील व सहा. पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री सुरेश भोसले यांचे सूचनेप्रमाणे दरोडा प्रतिबंधक पथक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, सपोफौज. यशवंत आंब्रे, सपोफौज. संजय दळवी, पो.हवा. शैलेश जगताप, पो.हवा.संतोष पागार, पो.हवा.निलेश पाटील, पो.हवा.विनायक जोरकर, पो.हवा. विनायक पवार, पो.हवा. हरीभाऊ रणपीसे, पो.हवा. अजय भोसले, पोना. महेश कदम, पो.ना. परवेज जमादार, पो.ना. सचिन गायकवाड, पो.शि. प्रविण जाधव यांनी सदरची कारवाई केलेली आहे.